मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीरातीसाठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# मोबाईल बंदीमुळे मतदार मतदान न करताच माघारी!

## व्होटर स्लीप मोबाईलमध्ये असल्याने आणि मोबाईल बंदीमुळे मतदार मतदान न करताच फिरताहेत माघारी!

**पिंपरी | प्रतिनिधी**

मावळ लोकसभा मतदारसंघातील पिंपरी विधानसभा मतदारसंघांमध्ये मतदानास सुरुवात झाली आहे. मतदान केंद्राच्या १०० मीटर आत मध्ये मोबाईल नेण्यास बंदी आहे. बंदोबस्तात असलेल्या पोलिसांबरोबर मतदाराचा वाद होत आहे. मोबाईल असलेल्या मतदारांना पोलीस मतदान केंद्रामध्ये सोडत नाही. मोबाईल ठेवायचा कुठे असा प्रश्न पडू लागला आहे. परिणामी अनेक मतदार नाराज होऊन माघारी फिरत असल्याचे चित्र आहे.



यापूर्वी लोकसभा निवडणुकीच्या झालेल्या मतदानाच्या दिवशी मतदान केंद्रामधील फोटो व व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाले आहेत. त्यामध्ये अनेक मतदारांनी त्यांच्या उमेदवाराला मतदान करतानाचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल केला आहे.

त्यामधून निवडणूक आयोगाच्या नियमांचे उल्लंघन होत असल्याचे दिसून आले आहे. त्यामुळे आज पार पडत असलेल्या निवडणुकी वेळी मावळ लोकसभेअंतर्गत येणाऱ्या पिंपरी-चिंचवड विधानसभेमध्ये पोलिसांनी मोबाईल वापरण्यावर सक्त बंदी केली आहे.

मतदान केंद्राच्या प्रवेशद्वारावर याबाबत सूचना लावण्यात आल्या आहेत. तसेच प्रवेशद्वारावर तगडा पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला आहे. जे मतदार मोबाईल घेऊन येत आहेत त्यांना पुन्हा माघारी पाठवले जात आहे.

शंभर मीटरच्या बाहेर मोबाईल ठेवण्याची सोय नसल्याने पोलीस प्रशासन आणि मतदार यांच्यामध्ये वादाचे प्रसंग ओढावत आहेत. तसेच अनेक मतदार मतदान न करताच पुन्हा माघारी फिरत आहेत.

मावळ लोकसभा मतदार संघाची आज निवडणूक पार पडत आहे. महायुतीकडून श्रीरंग बारणे आणि महाविकास आघाडीचे उमेदवार संजोग वाघेरे पाटील यांच्यात ही लढत होत आहे. दुपारी ३ वाजेपर्यंत या मतदारसंघात ३६.५४ टक्के एवढे मतदान झाले आहे. दरम्यान सकाळी ९ वाजेपर्यंत ५.३८ %, सकाळी ११ वाजेपर्यंत १४.८७%, दुपारी १ वाजेपर्यंत २७.१४ % एवढे मतदान झाले होते.

मावळ लोकसभा मतदारसंघामध्ये एकूण ६ विधानसभा मतदारसंघ येतात. यामध्ये पनवेल, कर्जत, उरण, मावळ, चिंचवड आणि पिंपरी विधानसभा मतदारसंघांचा समावेश होतो. या संपूर्ण लोकसभा कार्यक्षेत्रात २५ लाख ८५ हजार १८ मतदार असून यामध्ये १३ लाख ४९ हजार १८४ पुरूष मतदार, १२ लाख ३५ हजार ६६१ महिला मतदार आणि १७३ तृतीयपंथी मतदार आहेत. मावळ लोकसभा मतदारसंघामध्ये एकूण एकूण २ हजार ५६६ मतदान केंद्रे स्थापित करण्यात येणार आहेत. या मतदारसंघात ३३ उमेदवार निवडणूकीसाठी रिंगणात आहेत.

### वोटर स्लिप मोबाईल मध्येच

**» अनेक मतदारांनी आपले मतदार यादीतील नाव ऑनलाईन पद्धतीने मोबाईलमध्ये शोधले आहे. त्यामुळे त्यांची वोटर स्लिप देखील मोबाईलमध्ये आहे. त्यामुळे असे मतदार मोबाईल घेऊनच आतमध्ये जाण्याचा आग्रह धरतात. परिणामी पोलीस प्रशासन आणि मतदार यांच्यामध्ये खटके उडत असल्याचे चित्र पिंपरी-चिंचवडमध्ये आहे.**

# अभिनेत्री सोनाली कुलकर्णीने बजाविला मतदानाचा हक्क!

## सर्वांनी घरातून बाहेर पडावे आणि मतदान करावे : अभिनेत्री सोनाली कुलकर्णींचं मतदारांना आवाहन

**पिंपरी | प्रतिनिधी**

मराठी अभिनेत्री सोनाली कुलकर्णी हिने निगडी प्राधिकरणातील ज्ञान प्रबोधिनी नवनगर विद्यालय या मतदान केंद्रावर जात मतदान केले. सर्वांनी घरातून बाहेर पडावे आणि मतदान करावे. मी केले सर्वांनी मतदान करावे, असे आवाहन सोनाली कुलकर्नीने मतदारांना केलं.

अभिनेत्री सोनाली कुलकर्णी म्हणाली, की मतदानादिवशी मतदार इकडे तिकडे फिरायला जातात असे मला वाटत नाही. लोक मतदान करत नाहीत, याची अनेक कारणे असू शकतात. लोकांचा कोणावरच विश्वास राहिला नाही. त्यामुळे कोणाला मत द्यावे, का द्यावे, त्यातून का



होणार आहे पुढे असे बरेच प्रश्न लोकांसमोर निर्माण झाले आहेत. या प्रश्नांना उत्तर द्यायचे असेल, किंबहुना हे का घडतेय, त्याच्या बद्दल प्रश्न विचारायचे असतील, तक्रारी करायच्या असतील तर मतदानाचा हक्क बजवावा.

दरम्यान, दुपारी 1 वाजेपर्यंत शिरूर लोकसभा मतदारसंघासाठी 26.62 टक्के मतदान झाले आहे. अनेक ठिकाणी मतदारांनी रांगा लावल्याचे चित्र दिसत असून मतदार यादीत नाव वगळल्याच्या तक्रारी ही मतदारांकडून येत आहेत पहिल्या दोन तासात मतदान शांततेत पार पडल्याचे जिल्हा प्रशासनाकडून सांगण्यात आले.

# ‘बारामती’ची EVM ठेवलेल्या गोदामाचे सीसीटीव्ही बंद

## केंद्र सरकारकडून सत्तेचा गैरवापर सुरु : शरद पवारांचा पंतप्रधान नरेंद्र मोदींवर हल्लाबोल

**पुणे | प्रतिनिधी**

राज्यात लोकसभा निवडणुकीचे चौथ्या टप्प्यातील मतदान सुरु असताना बारामतीतून एक धक्कादायक माहिती समोर आली आहे. बारामती लोकसभेसाठी 7 मे रोजी मतदान पार पडले होते. त्यानंतर बारामतीमधील सर्व मतदान केंद्रांवरील ईव्हीएम मशीन्स या एका गोदामातील स्ट्राँग रुममध्ये ठेवण्यात आल्या होत्या. ईव्हीएम मशीन्स असलेल्या या स्ट्राँग रुमवर सीसीटीव्ही कॅमेऱ्यांच्या माध्यमातून निगराणी ठेवली जात आहे. मात्र, सोमवारी सकाळी या स्ट्राँग रुमचे बाहेरच्या मॉनिटरवर दिसणारे सीसीटीव्ही फुटेज अचानक बंद झाल्याची घटना घडली. त्यामुळे शरद पवार गटाचे कार्यकर्ते आक्रमक झाले आहेत.



सुप्रिया सुळे यांचे निवडणूक प्रतिनिधी लक्ष्मीकांत खाबिया यांनी यासंदर्भात सोशल मीडियावर एक व्हिडिओ शेअर केला. यामध्ये त्यांनी म्हटले की, ईव्हीएम मशीन्स ठेवलेल्या स्ट्राँग रुमचं सीसीटीव्ही फुटेज सकाळी 10.25 वाजल्यापासून बंद आहे. यामागे नेमके काय कारण आहे? मी यासाठी त्या विभागाच्या आरओला फोन केला, पण त्यांनी फोन उचलला नाही. तिकडे टेक्निशियन्स नाहीत, आमच्या लोकांना गोदामापर्यंत जाऊ दिले जात नाही. हे सगळं काय चाललंय, असा प्रश्न लक्ष्मीकांत खाबिया विचारला. सीसीटीव्ही फुटेज बंद असताना काहीतरी काळबेरं होण्याची शक्यता तर नाही ना, असा संशय माझ्यासारख्या कार्यकर्त्यांच्या मनात बळावल्याशिवाय राहत नाही, असेही त्यांनी म्हटले.

दरम्यान, साधारण पाऊण तासानंतर स्ट्राँग रुमचे सीसीटीव्ही फुटेज मॉनिटरवर पुन्हा दिसायला लागले. मात्र, या काळात काही गैरप्रकार तर घडला नाही ना, अशी शंका शरद पवार गटाकडून व्यक्त केली जात आहे. याबाबत आता निवडणूक आयोग आणि प्रशासन काय स्पष्टीकरण देणार, हे पाहावे लागेल.

**शरद पवार गटाचा रडीचा डाव: अमोल मिटकरी**

बारामती लोकसभा मतदारसंघातील निवडणुकीनंतर ठेवलेल्या ईव्हीएमच्या ठिकाणचे सीसीटीव्ही बंद असल्याचा शरद पवार गटाचा आरोप हा रडीचा डाव असल्याची टीका राष्ट्रवादीचे आमदार अमोल मिटकरी यांनी केली. सुप्रिया सुळे यांचा बारामतीत पराभव होणार असल्यानेच त्यांच्याकडून सातत्याने असे आरोप होत असल्याचे मिटकरी यांनी म्हटले.

### निवडणूक अधिकाऱ्यांचं स्पष्टीकरण

» बारामती लोकसभा मतदारसंघातील मतदान यंत्रे पुण्यातील कोरेगाव पार्क भागातील शासकीय गोदामात ठेवण्यात आली आहेत. याठिकाणी लावलेले सीसीटीव्ही कॅमेरा काही वेळासाठी बंद होते, असा आरोप राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाकडून करण्यात आलाय. निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी मात्र सी सी टी व्ही कॅमेरे बंद नव्हते असा दावा केला आहे. केवळ सी सी टी व्ही कॅमेरांची दृश्ये ज्या स्क्रिनवर दिसतात, ती स्क्रिन काही वेळासाठी बंद होती, असे निवडणूक अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले.

# अमोल कोल्हेंचं अजितदादांना प्रत्युत्तर

## शिरुरची जनता मत विकत घेणाऱ्याला थारा देणार नाही : अमोल कोल्हेंचं विधान

**पुणे | प्रतिनिधी**

“प्रत्येक पक्षाला आपल्या कार्यकर्त्यांचं मनोबल वाढवण्याचा अधिकार आहे. महायुतीला त्यांचा पराभव स्पष्ट दिसतोय. त्यामुळे कार्यकर्त्यांचं मनोबल वाढवण्यासाठी ते अशा पद्धतीची विधान करतायत” असं अमोल कोल्हे म्हणाले. अमोल कोल्हे शिरुर लोकसभा मतदारसंघातील महाविकास आघाडीचे उमेदवार आहेत. त्यांचा सामना महायुतीचे उमेदवार शिवाजीराव अढळराव पाटील यांच्या विरुद्ध आहे. कार्यकर्त्यांनाकडून पैसे वाटप झाल्याच्या तक्रारी येत आहेत, त्या प्रश्नावर अमोल कोल्हे म्हणाले की, “अशा घटना कार्यकर्त्यांकडून समोर येत आहेत. त्या ठिकाणी पोलीस यंत्रणेला सजग करण्याचा प्रयत्न करतोय. अशा पद्धतीने मतदाराचं मत विकत घेण्याची कोणाची मानसिकता असेल, तर मग नंतर मायबाप मतदाराच्या प्रश्नासाठी किती जागरुक राहणार, हा जनतेनेही विचार करण्याची गरज आहे. शिरुरची जनता मत विकत घेणाऱ्याला थारा देणार नाही.”



अमोल कोल्हे यांनी एका बँकेसंदर्भात पत्र दिलं होतं. बारामतीचा प्रकार उघड झाल्यानंतर त्यावर कारवाई झाली का? असं विचारण्यात आलं. त्यावर ते म्हणाले की, “काही पतसंस्थांमधून संस्थेत विविध पदांवर असणाऱ्यांना भरमसाट कर्ज दिली गेली. त्यामुळे संशय निर्माण होतो. ज्या बँकेची शाखा बारामतील लोकसभा मतदारसंघात मध्यरात्री उघडी होती, पोलीस यंत्रणेला सजग राहण्यासाठी म्हणून पत्र दिलं होतं.”

### ‘संध्याकाळी कन्फर्म लीड सागंतो’

» शिरुर लोकसभा मतदारसंघात पाच आमदार आमच्याकडे आहेत, असा महायुतीचा दावा आहे, या प्रश्नावरही कोल्हे यांनी उत्तर दिलं. “पाच वर्षांपूर्वी लोकसभेची निवडणूक झाली, तेव्हा पाच आमदार विरोधकांकडे तर एक आमदार राष्ट्रवादीकडे होता. आजही तीच स्थिती आहे, विधानसभेनंतर चित्र पालटेल” अजितदाद म्हणतात की, मागच्यावेळी मी निवडून आणलं, यावेळी पाडणार. त्यावर अमोल कोल्हे म्हणाले की, “आदरणीय साहेब माझ्या पाठिशी आहेत. शरदचंद्र पवार यांच्यावर प्रेम करणारी शिरुरची जनता आहे. उद्धव ठाकरे यांचा कडवट शिवसैनिक पाठिशी आहे. महाविकास आघाडी दैदीप्यमान असा विजय मिळवेल” किती मताधिक्क्याने विजय होणार, यावर ‘आता लीड लांगणार नाही. संध्याकाळी कन्फर्म लीड सागंतो’ असं उत्तर दिलं.

# शरद पवारांकडूनच पक्ष फोडण्याच्या राजकारणाला सुरुवात

## राज ठाकरे यांचा सर्वात मोठा आरोप : महाराष्ट्रात फोडाफोडीचं राजकारण

**पिंपरी | प्रतिनिधी**

"या फोडाफोडीच्या राजकारणात महाराष्ट्रात कुणी सुरुवात केली असेल तर ती शरद पवार यांनी केली. त्यांनी पहिल्यांदा काँग्रेस फोडली. 1977-78 साली गोष्ट असेल, पुलोदचं सरकार स्थापन झालं. महाराष्ट्रात पहिल्यांदा अशाप्रकारचं फोडाफोडीचं राजकारण झालं, या गोष्टीला शरद पवार यांनी सुरुवात केली", असा आरोप राज ठाकरे यांनी केला.

मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांची आज ठाण्यात जाहीर सभा पार पडली. शिवसेनेचे ठाणे लोकसभा मतदारसंघाचे उमेदवार नरेश म्हस्के आणि कल्याण लोकसभा मतदारसंघाचे उमेदवार श्रीकांत शिंदे यांच्या प्रचाराच्या निमित्ताने राज ठाकरे यांची आज ठाण्यातील कळवा येथे सभा पार पडली. या सभेत राज ठाकरे यांनी ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रमुख शरद पवार यांच्यावर जोरदार निशाणा साधला. यावेळी राज ठाकरे यांनी शरद पवार यांच्यावर गंभीर आरोप केला. महाराष्ट्रात फोडाफोडीच्या राजकारणाला शरद पवार यांनी सुरुवात केली, असा मोठा आरोप राज ठाकरे यांनी केला.



### राज ठाकरे शरद पवारांबाबत काय म्हणाले?

» “काय ढेकणा संगे हिराही भंगला. बरोबर शरद पवार बसले आहेत. या फोडाफोडीच्या राजकारणात महाराष्ट्रात कुणी सुरुवात केली असेल तर ती शरद पवार यांनी केली. त्यांनी पहिल्यांदा काँग्रेस फोडली. 1977-78 साली गोष्ट असेल, पुलोदचं सरकार स्थापन झालं. महाराष्ट्रात पहिल्यांदा अशाप्रकारचं फोडाफोडीचं राजकारण झालं, या गोष्टीला शरद पवार यांनी सुरुवात केली. मग 1991, याच शरद पवारांनी छगन भुजबळांना फितवून बाळासाहेब ठाकरे यांची शिवसेना पुन्हा फोडायला लावली. त्यावेळेला शिवसेनेचे आमदार फोडण्याचं काम याच शरद पवारांनी केलं होतं”, असा घणाघात राज ठाकरेंनी केलं. “ज्या छगन भुजबळांना फोडलं, आज ते इथे असतील. माझा बाहेरुन पाठिंबा आहे त्यामुळे मी काहीही बोलू शकतो. आपल्याला थोडी फेविकॉलचा जोड लागणार आहे”, अशी मिश्किल टिप्पणी यावेळी राज ठाकरे यांनी केली.

“लोकांच्या जीवन-मरणाचे रोजचे जे विषय आहेत ते विषय यायला हवेत. काय निवडणूक चालू आहे, कशावर निवडणूक चालू आहे? वडील चोरले. फोडाफोडीचं राजकारण मला कधी मान्य झालं नाही आणि कधी होणारही नाही. पण या सगळ्यात जे आज बोलत आहेत की, आमचा पक्ष फोडला. तुम्ही सर्वजण जे कोणत्या आघाडीत बसला आहात, जरा एकमेकांकडे बघा, आपण काय उद्योग केलेत ते. याच उद्धव ठाकरेंनी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे 7 पैकी 6 नगरसेवक हे खोके देवून फोडले होते ना? तेव्हा काही वाटलं नाही? अहो, मागितले असते तर दिले असते”, अशा शब्दांत राज ठाकरे यांनी उद्धव ठाकरेंवर निशाणा साधला.

सुषमा अंधारेंच्या अनेक क्लिप्स आहेत, मला काही देणं-घेणं नाही. म्हाताऱ्याच्या हातात थरथर करणारा हात, असं वक्तव्य करणाऱ्या व्यक्तीला प्रवक्ता करता आणि आपल्या वडिलांवर प्रेम आहे असं सांगता. छगन भुजबळांबरोबर मांडीला मांडी लावून बसता, तेव्हा वाटलं नाही. कसलं फोडाफोडीचं राजकारण म्हणतायत तुम्ही? मी बाळासाहेबांना सांगून बाहेर पडलो. मी त्यांना मिठी मारली आणि म्हंटलो येतो मी. बाळासाहेब ठाकरे सोडून कोणाच्याही हाताखाली काम करणार नाही. पक्षाचे चढउतार आलेत तर, मार्ग काढीन त्यातून, असं राज ठाकरे यांनी यावेळी नमूद केलं आहे.

दोन वर्षांच्या आधीचा काळ काढून बघा. मधातच टुम काढली अडीच-अडीच वर्षाचं बोलणं झालं बंद खोलीत. आमचा मुख्यमंत्री देवेंद्र असणार, असं नरेंद्र मोदी आणि शाह बोलले, तेव्हा नाही बोललात. मला हल्ली कळतंच नाही, कोण कोणासोबत आहेत. सांगण्याचं कारण एवढंच की, 2019 नंतर गोंधळ उडाला, तो तुमच्या महत्त्वकांक्षेपाई, त्यांनी उद्धव ठाकरेंवर टीका केली आहे.

### उद्धव ठाकरेंनी खोके देऊन मनसेचे नगरसेवक फोडले

» राज ठाकरे यांनी उद्धव ठाकरेंवर टीका करताना म्हटलं की, फोडाफोडीचं राजकारण मला कधी मान्य झालं नाही आणि कधी होणारही नाही, पण या सगळ्यात जे आज बोलतायत आमचा पक्ष फोडला, आमचा पक्ष फोडला, तुम्ही जे बसलेले आहाता, कुठच्या तरी आघाडी, जरा एकमेकांकडे एकदा बघा, आपण काय उद्योग केलेत ते. याचं उद्धव ठाकरेंनी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे सात पैकी सहा नगरसेवक खोके-खोके देऊन फोडले होतेत ना, तेव्हा काही नाही वाटलं. अहो, मागितले असते, तर दिले असते. पण काय आहे, ते म्हणतात ना, ढेकणासंगे हिराही भंगला. बरोबर शरद पवार बसलेत.

---

# पिंपरी चिंचवड महापालिकेचा हरित मतदान केंद्र उपक्रम

## उद्यान विभागाने पर्यावरणाचा संदेश देण्यासाठी हरीत मतदान केंद्र उपक्रम राबविला

**पिंपरी | प्रतिनिधी**

लोकसभा निवडणूकीच्या पार्श्वभूमीवर पिंपरी चिंचवड महानगपालिकेचे आयुक्त शेखर सिंह यांच्या संकल्पनेतून महानगरपालिकेच्या उद्यान विभागाने मतदारांच्या माध्यमातून पर्यावरणाचा संदेश देण्यासाठी हरीत मतदान केंद्र उपक्रम राबविला आहे.

तसेच २०२४-२५ आर्थिक वर्षात हरीतदूत स्वयंसेवक फळी निर्माण करून वृक्षारोपण कार्यक्रमदेखील आयोजित करण्यात येणार आहे, अशी माहिती उपायुक्त श्री.घोडके यांनी दिली आहे .हरित मतदान केंद्र उपक्रमात उद्यान अधिकारी प्रणव ढवळे आणि त्यांचे सर्व अधिकारी, कर्मचारी, माळी प्रशिक्षणार्थी यांचे सहकार्य लाभले आहे.अतिरिक्त आयुक्त प्रदिप जांभळे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली उद्यान विभागाचे उपायुक्त रविकिरण घोडके यांच्या अधिपत्याखाली पिंपरी चिंचवड शहरातील पी. के. इंटरनॅशनल स्कूल पिंपळे सौदागर, एनसीआरडी स्टर्लिंग स्कूल भोसरी, ज्ञानप्रबोधिनी शाळा निगडी, डी. वाय. पाटील ज्युनियर कॉलेज शाहूनगर येथे असलेल्या लोकसभा मतदार संघाच्या मतदान केंद्रावर संकल्पित चार हरीत मतदान केंद्र साकारण्यात आली आहेत.




### वृक्षारोपण कार्यक्रमदेखील आयोजित

» या उपक्रमामध्ये नक्षत्र वाटिका, १४२ आयुर्वेदिक वनस्पती, देशी वृक्षांच्या बीजांचे वाटप, मतदारांना प्रोत्साहनपूरक रोपांचे वाटप करण्यात येणार आहे. तसेच २०२४-२५ आर्थिक वर्षात हरीतदूत स्वयंसेवक फळी निर्माण करून वृक्षारोपण कार्यक्रमदेखील आयोजित करण्यात येणार आहे, अशी माहिती उपायुक्त श्री. घोडके यांनी दिली आहे.हरित मतदान केंद्र उपक्रमात उद्यान अधिकारी प्रणव ढवळे आणि त्यांचे सर्व अधिकारी, कर्मचारी, माळी प्रशिक्षणार्थी यांचे सहकार्य लाभले आहे.

# शिवसिंहाची औलाद आहे थांबणार नाही

## आतापर्यंत आज्ञाधारक अमोल कोल्हे बघितला, आता बंडखोर बघाल : अजित पवारांना थेट आव्हान

**पुणे | प्रतिनिधी**


शिवसिंहाची औलाद आहे, थांबणार नाही. अजून विधानसभा बाकी आहे करारा जबाब मिलेगा. आतापर्यंत आज्ञाधारक अमोल कोल्हे बघितला, आता कफन बांधलेला बंडखोर अमोल कोल्हे बघाल, या शब्दांत महाविकास आघाडीचे उमेदवार खासदार डॉ. अमोल कोल्हे यांनी आज उपमुख्यमंत्री अजित पवारांना थेट आव्हान दिलं.

महाविकास आघाडीतील राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे उमेदवार खासदार डॉ. अमोल कोल्हे यांच्या प्रचाराची सांगता सभा आज नारायणगावात पार पडली. भर पावसात या सभेला नारायणगावकरांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या सभेला प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील, काँग्रेसचे नेते बाळासाहेब थोरात, चंद्रकांत हांडोरे, शिवसेना (उबाठा) नेते भास्कर जाधव, सत्यशील शेरकर आदी उपस्थित होते.

या सांगता सभेत महायुतीचे उमेदवार शिवाजीराव आढळराव पाटील यांच्यासह उपमुख्यमंत्री अजित पवारांवर थेट निशाणा साधत हल्ला चढवला. डॉ. कोल्हे म्हणाले की, जेव्हा एक भूमिका घ्यायची वेळ आली होती, तेव्हा स्वार्थासाठी सरपटणाऱ्यांच्या रांगेत जायचं नाही हे ठरवलं होतं. 'दादा आपसे बैर नहीं, लेकीन बीजेपी की खैर नहीं' हा आमचा बाणा आहे. ज्या भाजपने आमचा अपेक्षाभंग केला त्यांची तळी तुम्ही उचलत आहात. असे म्हणत डॉ. कोल्हे म्हणाले की, राज्याच्या उपमुख्यमंत्र्याला 12 सभा घ्याव्या लागत असतील तर हा माझा गौरव आहे.

शिवाजीराव आढळराव पाटील हे संसदेत आपल्या कंपनीच्या फायद्यासाठी संरक्षण खात्याविषयी कसे प्रश्न विचारत होते, हे डॉ. कोल्हे यांनी पुराव्यांसह दाखवले. त्यानंतर त्यांच्याकडून डॉ. कोल्हे यांना कायदेशीर नोटीस पाठवण्यात आली. ही नोटीस जाहीर सभेत दाखवत, कितीही नोटीस आल्या तरी त्याचा विचार करत नाही, कारण प्रश्न सर्वसामान्य जनतेचा आहे. जनहिताचे, लोकशाहीचे प्रश्न विचारत राहणार, असे सांगितले.

डॉ. अमोल कोल्हे यांच्या प्रचाराची सांगता सभा नारायणगावात भरपावसात झाली. त्यावेळी ते बोलत होते. ते म्हणाले, "जेव्हा एक भूमिका घ्यायची वेळ आली होती, तेव्हा स्वार्थासाठी सरटणाऱ्यांच्या रांगेत जायचं नाही हे ठरवलं होतं. उपमुख्यमंत्र्यांना १२ सभा घ्याव्या लागत असतील, तर हा माझा गौरव आहे." अमोल कोल्हे म्हणाले...कडेवर घेतलेल्या उमेदवाराच्या प्रचारात पालकमंत्री व्यग्र आहेत.



### नोटीसा पाठवल्या तरी प्रश्न विचारत राहणार..

» शिवाजीराव आढळराव पाटील हे संसदेत आपल्या कंपनीच्या फायद्यासाठी संरक्षण खात्याविषयी कसे प्रश्न विचारत होते, हे डॉ. कोल्हे यांनी पुराव्यासह दाखवलं. त्यानंतर त्यांच्याकडून डॉ. कोल्हे यांना कायदेशीर नोटीस पाठवण्यात आली. ही नोटीस जाहीर सभेत दाखवत,डॉ. कोल्हे म्हणाले की, प्रश्न विचारले तेव्हा रामलिंग महाराजांची शपथ घेतली आणि सांगितलं माझा काही संबंध नाही. मराठी माणूस उद्योगपती असल्याचा अभिमान आहे. पण महाराष्ट्रात भूमिहीन शेतमजूर जो भारतात असोत त्याचा अमेरिकेत बंगला असतो याच गौडबंगाल कळलं नाही. कितीही नोटीस आल्या तरी त्याचा विचार करत नाही.

### बिबट्याच्या प्रश्नांवर लक्ष द्या

» कडेवर घेतलेल्या उमेदवाराच्या प्रचारात पालकमंत्री व्यस्त आहेत. प्रचारातून बाहेर या आणि बिबट्याच्या प्रश्नांवर लक्ष द्या. बिबट्याचा प्रश्न हा माझ्या माणसांसाठी गंभीर प्रश्न आहे, असं म्हणत बिबट्याच्या प्रश्नाकडे राज्य सरकारकडून होत असलेल्या दुर्लक्षावरुनही डॉ. कोल्हे यांनी अजित पवारांना सुनावलं.

# आचारसंहिता भंगाच्या 1 हजार 500 तक्रारींवर कार्यवाही

## तथ्य नसलेल्या उर्वरित 176 तक्रारी वगळण्यात आल्या : जिल्हा निवडणूक प्रशासन


**पुणे | प्रतिनिधी**

लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीदरम्यान जिल्ह्यात 'सी- व्हिजील' ॲपच्या माध्यमातून १५ मार्चपासून ते आतापर्यंत प्राप्त १ हजार ५०५ तक्रारींपैकी १ हजार ३२९ तक्रारींमध्ये तथ्य आढळून आल्याने कारवाई करण्यात आल्याची तर तथ्य आढळले नसलेल्या उर्वरित १७६ तक्रारी वगळण्यात आल्याची माहिती जिल्हा निवडणूक प्रशासनातर्फे देण्यात आली आहे.

लोकसभा सार्वत्रिक निवडणूक आदर्श आचारसंहितेच्या उल्लंघनाच्या तक्रारी नोंदवण्यासाठी आणि त्याचा मागोवा घेण्यासाठी निवडणूक आयोगाच्या 'सी-व्हिजिल' ॲपला नागरिकांचा मोठा प्रतिसाद मिळत आहे. त्या माध्यमातून दाखल होणाऱ्या तक्रारींवर लक्ष ठेवण्यासाठी जिल्हा स्तरावर सी-व्हिजिल कक्ष कार्यान्वीत आहे.

सी-व्हिजिल ॲपवर नागरिक माहिती, छायाचित्र, चित्रफीत अपलोड करुन आचारसंहिता भंगाच्या तक्रारी करु शकतात. नागरिकांना आपली ओळख उघड न करता तक्रार दाखल करण्याची सोय या ॲपमध्ये आहे. अशा प्रकारे १५ मार्चपासून आतापर्यंत १ हजार ५०५ तक्रारी प्राप्त झाल्या. यापैकी १ हजार ३२९ तक्रारींवर कारवाई तर उर्वरित १७६ तक्रारी निवडणूक निर्णय अधिकारी व सहायक निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या स्तरावर वगळण्यात आल्या.

आदर्श आचारसंहितेचे काटेकोरपणे पालन व्हावे आणि निवडणुका शांततेत आणि मुक्त वातावरणात घेण्याचे भारत निवडणूक आयोगाचे मुख्य उद्दिष्ट आहे. आचारसंहितेचे उल्लंघन करणाऱ्या अनुचित प्रकारांची तक्रार या ॲपच्या माध्यमातून नागरिकांना थेट ऑनलाईन करता येते. या ॲपमुळे नियमांचे उल्लंघन करणाऱ्या तक्रारी स्वीकारणे, या तक्रारीवर अवघ्या १०० मिनिटांत कार्यवाही करणे अपेक्षित असते.



### असा आहे आपत्कालीन वैद्यकीय कक्ष...

» आंबेगाव विधानसभा-२३ (१६), बारामती-५४ (३०), भोर-३ (२), भोसरी-४ (३), चिंचवड-३३ (२२), दौंड-२८ (१९), हडपसर-४७ (४०), इंदापूर-४७ (४०), जुन्नर-३७ (३५), कसबापेठ-२४७ (२२३), खडकवासला-७८ (७१), खेड आळंदी-३ (१), कोथरूड-४३ (३२), मावळ-४५ (३०), पर्वती-२५८ (२५७), पिंपरी-११ (९), पुण कॅन्टोन्मेंट-१०९ (९१), पुरंदर-११ (८), शिरूर-३२ (१५), शिवाजीनगर-७१ (७०) व वडगाव शेरी विधानसभा मतदारसंघात – ३२१ (३१५) अशा एकूण १ हजार ५०५ तक्रारी प्राप्त झाल्या व १ हजार ३२९ तक्रारींवर कारवाई झाली.जिल्ह्यात चौथ्या टप्प्यात मावळ, पुणे आणि शिरूर लोकसमतदासंघाकरीता सोमवार १३ मे रोजी मतदान होत आहे. जिल्ह्यात कुठेही आचारसंहितेचे उल्लंघन होत असेल तर नागरिकांनी तेथील छायाचित्र किंवा चित्रफीत काढावी आणि तत्काळ सी-व्हिजिल ॲपवर अपलोड करावे किंवा जिल्हा नियंत्रण कक्षाकडे आणि १८००२३३०१०२ आणि १९५० टोल फ्री क्रमांकावर तक्रार करावी, असे आवाहनही जिल्हा निवडणूक कार्यालयाने केले आहे.